# सोलापूर विद्यापीठ सोलापूर

## परीक्षा विभाग

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

### परिपत्रक क्र. - १४/२०१७

सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयातील मा.प्राचार्य एम.ई. अभ्यासक्रमातील Self Learning या परीक्षेबाबत या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की,

१. M.E. Self Learning Sem-III (New/Old Syllabus) या अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा (Theory Examination) ही एप्रिल/मे -२०१७ मध्ये व यापुढे होणा-या परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेला आहे.

२. सदर परीक्षा ही जाहीर केलेल्या अंतिम वेळापत्रकानुसार आपल्या महाविद्यालयात घेण्यात यावी.

३. सदर परीक्षे करीता मा.प्राचार्यानी आपल्या महाविद्यालयातील दोन (०२) पदव्युत्तर मान्यता प्राप्त प्राध्यापकांची प्राश्निक म्हणून नेमणूक करावी. या मान्यता प्राप्त प्राध्यापकांकडून संबंधित Self Learning (New/Old Syllabus) विषयाचे प्रत्येकी ०३ संच (set) तयार करुन घेवून त्यापैकी परीक्षेदिवशी परीक्षा सुरु होण्यापुर्वी ३० मिनिटे अगोदर ०१ संच पर्यवेक्षकांच्या स्वाधीन करावा. वरिष्ठ पर्यवेक्षकानी आवश्यक संख्येनुसार सदर प्रश्नपत्रिकेच्या छायांकित प्रति (Photocopy) करुन घेवून त्या संबंधित परीक्षा हॉलमध्ये वितरीत करावी.

४. सदर विषयाच्या प्राश्निकांची यादी (Panel of Paper Setter) दिनांक १५/०४/२०१७ पर्यंत परीक्षा विभागाकडील पेपर सेटिंग विभागाकडे सादर करावी तसेच प्रत्येक सत्रासाठी या-त्या सत्रातील लेखी परीक्षा सुरु होणा-या तारखेपूर्वी १२ दिवसाच्या आत परीक्षा विभागाकडे सादर करावी.

५. परीक्षा संपन्न झाल्यानंतर Self Learning विषयाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर परीक्षा संपल्यानंतर ०८ दिवसाच्या आत करुन या विषयाच्या गुणयादया (Mark-lists) व संबंधित उत्तरपत्रिका व प्रश्नपत्रिका विद्यापीठाकडे सादर कराव्यात.

उक्त बाब मा.प्राचार्य व विद्यापीठ परिसरातील मा.संचालक/विभागप्रमुख यांनी विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून घ्यावी व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन परीक्षेच्या कामकाजात विद्यापीठास सहकार्य करावे.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**संदर्भ क्रं. : सोविसो/परीक्षा/२०१६-१७/** 723

**दिनांक :** 7 APR 2017